डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)
सूचना का अधिकार
कुलसचिव
दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२

महत्वाचे

जा.क्र. साप्रवि/स्वातंत्र्यदिन/७३/७६५/२०२०
दि. ११/०८/२०२०

प्रति,

१) संचालक (विस्तार शिक्षण),
२) सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय,
३) विद्यापीठ अभियंता,
४) विद्यार्थी कल्याण अधिकारी
५) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell),
६) जनसंपर्क अधिकारी,
७) प्रभारी अधिकारी, पुष्पशास्त्र व प्रांगण उद्यान विभाग,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

**विषय : शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२० रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करणेबाबत.**
संदर्भ : विद्यापीठ आदेश क्र. साप्रवि/समारंभ व्यवस्था/१४५७/२०११, दि. २९/०७/२०११.

भारतीय स्वांतत्र्य दिनाच्या ७३ व्या वर्धापन दिनानिमित्य शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२० रोजी सकाळी ०८.०० वाजता विद्यापीठाच्या प्रशासकीय भवनासमोरच्या प्रांगणात मुख्य कार्यालयीन ध्वजारोहणाचा कार्यक्रम मा.डॉ. विलास भाले, कुलगुरू, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे शुभहस्ते संपन्न होणार आहे. त्यानुषंगाने ...

१) मा.संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पंदेकृवि., अकोला यांना विनंती करण्यात येते की, आपण समारंभाकरीता नियोजीत ठिकाणी प्रमुख चित्रकारांमार्फत व्यासपीठ डेकोरेशन/इतर डेकोरेशन, छायाचित्रकारांमार्फत छायाचित्रे काढणे तसेच काढलेले छायाचित्र जनसंपर्क अधिकारी यांचे कडे सोपविणे, फोटो अल्बम, कॅसेट/सिडी तयार करणे, इ. बाबत आपले अधिनस्त असलेले प्रमुख चित्रकार, चित्रकार, छायाचित्रकार यांना निर्देश द्यावेत.

२) सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, अकोला यांना कळविण्यात येते की, आपण समारंभाकरीता नियोजीत ठिकाणी ऑडीयो व्हिजुअल ऑपरेटर मार्फत टेप/ऑडीयो सिस्टीम, लाऊड स्पिकर/स्टिरीओ सिस्टीम, माईक, बॅटरी व आवश्यक साहित्याची व्यवस्था, राष्ट्रगीत तथा देशभक्तीपर गीतांची कॅसेट/सीडी यांची व्यवस्था करणे इ. बाबत आपले अधिनस्त असलेले ऑडीयो व्हिजुअल ऑपरेटर यांना आवश्यक साहित्यासह रंगीत तालीम घेण्याकरीता निर्देश द्यावेत.

३) विद्यापीठ अभियंता, डॉ. पंदेकृवि., अकोला यांना कळविण्यात येते की, आपण समारंभाकरीता नियोजीत ठिकाणी व्यासपिठ, बैठक व्यवस्थेकरीता Social Distancing चे तत्व पाळून खुर्च्यांची मांडणी करण्यात यावी (व्ही.आय.पी/फायबर), टिपॉय, वेलवेट पडदा, स्टेज व पाय-या वरील लाल कारपेट, सिल्क पडदे साईडचे (बांबुसह) इ. आवश्यक साहित्यांची व्यवस्था, मुख्य प्रशासकीय भवन व नियोजीत समारंभाच्या परिसराची साफसफाईची व्यवस्था, झेंडा लावण्याची व्यवस्था, लाईन आखणे, आवश्यक विजेची व त्यावरील उपकरणांची व्यवस्था करणे इ. बाबत आपले अधिनस्त असलेले उपअभियंता (सिव्हील) व उपअभियंता (विद्युत) तसेच संबधित अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक निर्देश द्यावेत. **पावसाळा लक्षात घेवुन व्यासपीठ मंडपाची व्यवस्था करण्यात यावी.**

...२.../-

REDMI NOTE 9 PRO MAX
AI QUAD CAMERA

४) विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनी महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक १० ऑगस्ट २०२० मधील मुद्दा क्र. १३ अन्वये अयोजीत करावयाचे Online कार्यक्रमाकरीता महाविद्यालयांशी समन्वय साधून योग्य ती मदत करावी.

५) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell), अकोला यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाचा ध्वजारोहण सोहळा कर्मचाऱ्यांना घरबसल्या पाहता यावा करीता थेट प्रक्षेपणाची सोय आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

६) जनसंपर्क अधिकारी, डॉ. पंदेकृवि., अकोला यांना कळविण्यात येते की, आपण समारंभादरम्यान संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन स्वत: करावे व समारंभाबाबतची बातमी तयार करून छायाचित्रासह वर्तमानपत्रामध्ये प्रकाशनाकरीता देणे इ. बाबत कार्यवाही करण्यात यावी.

७) प्रभारी अधिकारी, पुष्पशास्त्र व प्रांगण उद्यान विभाग, डॉ. पंदेकृवि., अकोला यांना कळविण्यात येते की, आपण समारंभाकरीता नियोजीत ठिकाणी व्यासपीठ डेकोरेशन/इतर डेकोरेशन, कुंड्यांची व स्मृती केंद्रातील व प्रशासकीय भवनासमोरील पुतळ्यांसाठी फुलांची माळ व पुष्पपाकळ्यांची व्यवस्था करणे इ. बाबत आपले अधिनस्त असलेले अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक निर्देश द्यावेत.

*संदर्भ क्र. १ मधील विद्यापीठ आदेशानुसार, सर्व संबंधीत कामाकरीता होणारा खर्च संबंधीत विभागांनी त्यांचे कार्यालयामार्फतच सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरात घेवुन, विहीत पद्धतीचा अवलंब करून, अतिशय चोख, काटकसरीने त्यांचे अधिनस्त मंजुर अनुदानातुनच भागविण्यात यावा. जर एखाद्या विभागास अनुदानाच्या उपलब्धतेबाब काही अडचण असल्यास त्यांनी आवश्यक अतिरीक्त अनुदान प्राप्तीचा प्रस्ताव तयार करुन त्यांच्या नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत तो नियंत्रक यांचेकडे परस्पर सादर करावा व प्राधिकरणाच्या मंजुरीने अतिरीक्त/ आवश्यक अनुदान प्राप्त करुन घ्यावे.*

**कुलसचिव,**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

**<u>प्रतिलीपी :</u>**

१) सुरक्षा अधिकारी, डॉ. पंदेकृवि.,अकोला यांनी भांडार विभागातुन राष्ट्रीय ध्वज व इतर आवश्यक साहित्य त्यांचे ताब्यात घेवुन ध्वजारोहणाची तालीम घ्यावी व ध्वजारोहणाचे दिवशी सायंकाळी ध्वज उतरविण्याबाबतची संपुर्ण जबाबदारी त्यांची राहील. तसेच मुख्य समारंभाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था, संपुर्ण कार्यक्रम यशस्वीपणे पारपाडण्याकरीता देखरेख करणे इ. बाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

२) उपकुलसचिव (सामान्य प्रशासन) व सहाय्यक कुलसचिव (सा.प्र.वि.) यांनी संपुर्ण समारंभ यशस्वीपणे पार पाडण्याकरीता देखरेख करणे इ. बाबत व्यक्तीगतरित्या तसेच त्यांचे अधिनस्त असलेले अधिकारी/कर्मचारी यांचे मार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

३) मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक यांना मा. कुलगुरू महोदयांचे माहिती करीता सविनय सादर.

४) ------------------------------------------------------------

**कुलसचिव,**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

REDMI NOTE 9 PRO MAX
AI QUAD CAMERA